# कॅस्टरब्रिजचा महापौर (The Mayor of Casterbridge): थॉमस हार्डी

संक्षिप्त मराठी कथारूप अनुवादः प्रा. डॉ. बिंदुमाधव जोशी

**प्रास्ताविक:**

हार्डीची सर्वात गाजलेली कादंबरी म्हणजे कॅस्टरब्रिजचा महापौर. माझ्या समकालीन बहुतेक सर्व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी ही वाचली असेल. हार्डीच्या सर्व वैशिष्ट्यांसह गीतेतील "आत्मैव आत्मनो रिपुः (६/५)" हे वचन सार्थ करणारा नायक ही या कादंबरीची आकर्षणे आहेत.

**प्रमुख पात्रे:**

| | |
|---|---|
| मायकेल हेंचर्ड - | सुरूवातीस शेतमजूर, नंतर महापौर. |
| सुसान - | हेंचर्डची सोशिक आज्ञाधारक शांत पत्नी. |
| एलिझाबेथ जेन - | सुसानची सुस्वरूप कन्या. |
| डोनाल्ड फार्फ्रे - | हेंचर्डचा मॅनेजर, नंतर प्रतिस्पर्धी. |
| ल्यूसेटा - | हेंचर्डची प्रेयसी, नंतर फार्फ्रेची पत्नी. |

**कथानक:**

कादंबरीची सुरूवात एका विचित्र प्रसंगाने होते. मायकेल हेंचर्ड हा तरूण शेतमजूर असतो. गरीबीला कंटाळून तो आपल्या पत्नीला - सुसानला - विकण्यासाठी बेडन या गावच्या जत्रेत येतो. एक वृद्ध स्त्री दारू गरम करून विकत असते. भरपूर दारू पिऊन त्या स्त्रीच्या मदतीने हेंचर्ड सुसानला व आपल्या एक वर्षाच्या मुलीला पाच गिनीला (गिनी म्हणजे पौंडपेक्षा थोडे अधिक किमतीचे नाणे) विकतो. असहाय सुसान निमूटपणे आपल्या मुलीला घेऊन नवीन मालक खलाशी न्यूसन याच्या बरोबर निघून जाते. (इंग्लंडमधे त्याकाळीही स्त्रीची विक्री करणे हा गुन्हा असतो, तरी त्यावेळी दूरच्या खेड्यांत गुपचूप असे प्रकार घडत असत.)

दुसरे दिवशी सकाळी दारूचा अंमल उतरल्यानंतर हेंचर्ड जागा होतो. आपण काय केले याची त्याला अपराधी जाणीव होते. तो सुसानची व न्यूसनची खूप चौकशी करतो. न्यूसनला कुणीच ओळखत नसल्यामुळे काहीच पत्ता लागत नाही. तो कोठून आला व सुसानला घेऊन कोठे गेला हे कुणालाच माहित नसते. हताश हेंचर्ड चर्चमधे येऊन येशूची प्रार्थना करतो व इथून पुढे २१ वर्षे दारूला स्पर्श करणार नाही अशी शपथ घेतो. बाहेर येऊन एक रस्ता धरून चालत राहतो. दारूचा व्यवसाय करणारी त्याच्या अपराधाची साक्षीदार वृद्धा त्याच्याकडे पाहात राहते. एक वर्षानंतर तो तिला परत येऊन सांगतो – ‘सुसान परत आल्यास मी कॅस्टरब्रिजला गेलो आहे असे तिला सांग’.

या घटनेला १९ वर्षे लोटतात. एके दिवशी सुसान आपल्या १८ वर्षे वयाच्या मुलीबरोबर - एलिझाबेथ जेन बरोबर - परत बेडनला त्या वृद्धेला भेटते. आपल्या नवऱ्याची चौकशी करते. त्या वृद्धेच्या अंतःकरणावर १९ वर्षांपूर्वीचा तो प्रसंग कोरलेला असतो. हेंचर्ड ज्या रस्त्याने गेला तिकडे ती बोट करते व सुसान त्या रस्त्याने चालत राहते. संध्याकाळी ती कॅस्टरब्रिज या छोट्या शहरात

प्रवेश करते. सुसान विधवेच्या काळ्या कपड्यात असते. बोटीवर खलाशाचे काम करणारा न्यूसन तिकडेच मृत्यू पावल्याची बातमी येते व नशीबाच्या फेऱ्यांनी हताश झालेली सुसान मुलीसाठी पहिल्या पतीच्या शोधार्थ बाहेर पडलेली असते.

कॅस्टरब्रिजमधे त्या दोघी एका हॉटेलमधे उतरतात. संध्याकाळी त्या हॉटेलमधे एक पार्टी भरते. कॅस्टरब्रिजचा महापौर मित्रांना मेजवानी देत असतो. सुसान सहजगत्या त्या लोकांच्या कडे पाहाते. आणि महापौर (मेयर) हेंचर्डच असतो. श्रीमंतीमुळे इतक्या वर्षांनंतर जरी त्याच्यात बदल झालेला असतो तरी तो आपला पूर्वीचा पती आहे याची तिला पूर्ण खात्री पटते. त्याच्या चेहऱ्यावर अजून तो अहंकार, बेगुमानपणा स्पष्ट असतो.

कॅस्टरब्रिज हे जुनाट शहर असते. एका बाजूने नदीचे पात्र असते व चारी बाजूंना दूरवर गव्हाची शेते असतात. १८ वर्षांपूर्वी शेतकामगार म्हणून जीवन सुरू केलेला हेंचर्ड कष्टाने व कर्तबगारीने गव्हाचा श्रीमंत व्यापारी झालेला असतो. कॅस्टरब्रिजचा महापौर झालेला असतो.

यावर्षी मात्र त्याच्यावर एक संकट आलेले असते. त्याने खरेदी गेलेला गहू सडलेला असतो व त्यापासून तयार केलेला ब्रेड खाण्याच्या लायकीचा नसतो. सर्व नागरीक त्याच्यावर टीका करत असतात व त्यावर उपाय शोधण्यासाठी त्याने ही बैठक बोलावलेली असते. डोनाल्ड फार्फ्रे नावाचा एक तरूण गव्हावर संशोधन करून सडक्या गव्हाला चांगला करण्याची पद्धत (recipe) घेऊन अमेरिकेला चाललेला असतो. त्याच्या कानावर कॅस्टरब्रिजची ही तक्रार आलेली असते. तो हेंचर्डशी संपर्क साधतो. एखाद्या देवदूतासारख्या आलेल्या फार्फ्रेचे हेंचर्ड स्वागत करतो व त्याला आपला मॅनेजर नेमतो. डोनाल्डच्या मदतीमुळे हेंचर्डवर आलेली आपत्ती टळते व त्याचा डोनाल्डवर पूर्ण विश्वास बसतो. इतका की हेंचर्ड एके दिवशी त्याला आपला सर्व पूर्वेतिहास सांगतो.

दरम्यान सुसान व हेंचर्ड यांची शहराबाहेर नदीच्या काठावर भेट होते. दोघांना एकमेकाची ओळख पटते. तिच्याशी पूर्वी केलेल्या अपराधाचे शल्य त्याच्या मनात असतेच. तो तिच्याशी लग्न करतो व तिला व एलिझाबेथला एका छान घरात ठेवतो. दोन वर्षे सुखात जातात.

आणि एके दिवशी या सुखाला दृष्ट लागते. एका क्षुल्लक अपराधाबद्दल संतापी हेंचर्ड आपल्या विश्वासू कामागाराला - व्हिटल नावाच्या नोकराला - मारहाण करतो. त्याचा हा अतिरेकीपणा न आवडून फार्फ्रे मध्यस्थी करतो व हेंचर्डला चार शब्द सुनावतो. हे हेंचर्डला आवडत नाही. त्या दोघांमधले मैत्रीचे वातावरण बिघडू लागते. काही दिवसांनी फार्फ्रे आपल्या नोकरीचा राजीनामा देतो व गहू व्यापाराचा स्वतंत्र व्यवसाय सुरू करतो. फार्फ्रेच्या हुशारीमुळे व सौम्य स्वभावामुळे थोड्याच दिवसात तो एक यशस्वी व्यापारी बनतो. तर हेंचर्डच्या व्यापाराला उतरती कळा लागते. याच वेळी सुसानचा मृत्यू होतो.

त्या काळात शहराचा महापौर हा न्यायाधीशाची भूमिकाही बजावत असतो. त्या भूमिकेतून एक खटला चालवत असताना सुसानच्या विक्रीच्या वेळी हजर असणारी दारू विकणारी वृद्धा त्याच्या पूर्वेतिहासाचा सविस्तर उल्लेख करते. हेंचर्डला त्या अपराधाची कबुली द्यावी लागते व त्याची प्रतिष्ठा रसातळाला जाते. त्याच्या ऐवजी फार्फ्रेला महापौर करण्याचा बेत ठरू लागतो. थोड्याच दिवसात तसे घडतेही. सुरूवातीच्या १८ वर्षांत हेंचर्डचे शेजारच्या शहरातील ल्यूसेटा नावाच्या तरूणीशी प्रेमाचे संबंध जुळलेले असतात. त्याने तिला लग्नाचे वचनही दिलेले असते. पण जगजाहीर झालेला त्याचा पूर्वेतिहास कळताच ती त्याच्याशी लग्न करण्यास नकार देते व फार्फ्रेशी तिचे संधान जुळते. त्यांचा विवाह लवकरच संपन्न होतो. फार्फ्रेच्या महापौरपदाच्या मिरवणुकीत दुर्दैवाने ल्यूसेटाचा मृत्यू होतो.

त्यानंतर फार्फ्रेचे एलिझाबेथशी प्रेमसंबंध जुळतात व हेंचर्ड पूर्णपणे एकाकी पडतो. एलिझाबेथने आपल्याला पिता म्हणून वागवावे, मुलीचे प्रेम आपणास द्यावे म्हणून हेंचर्ड एके दिवशी तिला आपला पूर्वेतिहास सांगतो व आपले पित्याचे एकाकी अंतःकरण तिच्यासमोर उघडे करतो. एलिझाबेथला हे थोडे अवघड जाते. कारण आतापर्यंत ती न्यूसनला आपला पिता समजत असते. तिचा हेंचर्डच्या शब्दावर विश्वास बसतो व दुसऱ्या दिवसापासून ती त्याच्या सांगण्याला मान्यता द्यायचे ठरवते.

परंतु हाय रे दैवा! त्याच रात्री सुसानच्या कागदपत्रात त्याला एक पाकीट सापडते. ते त्यालाच उद्देशून असते. पण त्याच्यावर एक सूचना असते - एलिझाबेथच्या विवाहापूर्वी उघडू नये. अर्धवट उघडे पडले असलेले ते पाकीट तो उघडतो व आतली चिठ्ठी वाचतो. सुसानने लिहिलेले असते – 'आपली एलिझाबेथ ताटातुटीनंतर लगेचच मरण पावली व आताची एलिझाबेथ न्यूसनपासून झालेली मुलगी आहे.' हेंचर्ड नशीबाच्या या खेळीने अधिकच उदास होतो. दुसऱ्या दिवशी एलिझाबेथ मोठ्या प्रेमाने बाबा म्हणून त्याच्या जवळ येते. त्याच्या गळ्यात लाडाने हात टाकून बोलू लागते. पण हेंचर्ड तिच्या आपुलकीला झिडकारतो. तिच्याशी तुटकपणाने व तुसडेपणाने वागतो. ती बिचारी हिरमुसली होऊन दूर जाते. हेंचर्डच्या आयुष्यातील प्रेमाचा आणखी एक धागा तुटून जातो.

महापौरपद गमावल्यामुळे व व्यापारात प्रचंड खोट आल्यामुळे हेंचर्डची कंगाल अवस्था झालेली असते. फार्फ्रेच्या शेतामधे नोकर म्हणून गवत कापण्याची पाळी त्याच्यावर येते. आयुष्यातील नष्टचर्याचे वर्तुळ पूर्ण होते. हेंचर्ड कॅस्टरब्रिज सोडून जायचे ठरवतो. चार दिवसांनी तो आलेल्या रस्त्याने बेडन गावी पोचतो. तेथे त्याला एक बातमी कळते. आणि त्याची पावले घुटमळतात. येत्या रविवारी म्हणजे तीन दिवसांनी एलिझाबेथ व फार्फ्रे यांचा विवाह होणार असतो. पित्याचे अंतःकरण विरघळते, तो लग्नाला हजर राहायचे ठरवतो. त्याची पावले परत कॅस्टरब्रिजकडे वळतात. वाटेत एका दुकानात एक सुंदर गोल्डफिंच असलेला सोनेरी पिंजरा त्याला दिसतो. त्याला पक्षी व पिंजरा हे दोन्हीही आवडतात. लग्नाची भेट म्हणून तो पिंजरा खरेदी करतो व कॅस्टरब्रिजमधे दाखल होतो.

लग्नाच्या हॉलमधे शिरताना त्याला एलिझाबेथच्या जवळ न्यूसन उभा दिसतो. परत तो मागे येतो. बऱ्याच दिवसांपूर्वी त्याची नदीकाठी न्यूसनशी भेट झालेली असते. 'एलिझाबेथ मरण पावली' असे खोटेच त्याने न्यूसनला सांगितलेले असते व न्यूसन खाली मान घालून निघून गेलेला असतो. न्यूसनला हॉलमधे पाहिल्यावर आता एलिझाबेथसाठीही जगण्याचे हेंचर्डला प्रयोजन उरलेले नसते. बाहेरच्या बागेत एका झाडाखाली पिंजरा ठेवून तो नदीकडे जातो. आयुष्यातील सर्व प्रेमाची माणसे एकेक करून आयुष्यातून निघून गेलेली असतात. आत्महत्येचे विचार त्याच्या मनात घोळू लागतात.

दोन दिवसांनी एलिझाबेथला हेंचर्ड आपल्या लग्नाला हजर होता अशी बातमी मिळते. बागेत शोध घेताना तिला तो पिंजराही सापडतो. त्यातील सोनेरी पक्षी अन्नपाण्याविना गतप्राण झालेला असतो. ती खूप दु:खी होते, तिला त्याच्या भावना जाणवतात. शोध करीत असताना हेंचर्डचा इमानी सेवक व्हिटल हेंचर्डच्या मृत्यूची बातमी तिला देतो - हेंचर्डने आत्महत्या केलेली असते. व्हिटल त्या घटनेचा साक्षीदार असतो. त्याच्या करूण कथनाने लेखक कादंबरीचा शेवट करतो.

हेंचर्ड अहंकारी, संतापी, हेकेखोर असतो. पण दुष्ट नसतो. त्याच्याही प्रेमाच्या कोमल भावना असतात. एका अपराधापायी नशीबाने त्याच्या जीवनाशी क्रूर खेळ केलेला असतो. त्याचा दुर्दैवी मृत्यू वाचकांच्या मनाला चटका लावून जातो. माझ्या महाविद्यालयीन शिकण्याच्या वेळी "कॅस्टरब्रिजचा महापौर" खूप लोकप्रिय होते. पुण्यातील प्राध्यापक ती खूप छान शिकवत असत. पण ही हृदयंगम कादंबरी मला ना शिकण्याचा योग आला ना कधी शिकवण्याचा.

ooooo-----ooooo

आपल्या प्रतिक्रिया/सूचना कळवाः
Phone: 020-25881194, 98811-49755
Email: joshi.bindumadhav@gmail.com